दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

वैभवशाली अहमदनगर, गौरवशाली अहिल्यानगर

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो,
जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक






।। राम कृष्ण हरि।।

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।*
*शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।।१।।*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन ।*
*शब्द वाटू धन जनलोका ।।२।।*
*तुका म्हणे पहा शब्दचि हा देव ।*
*शब्देचि गौरव पुजा करू ।।३।।*
*- संत तुकाराम*


• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३४७ वा • शनिवार, ता. ०५ जुलै २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००


# ‘जय गुजरात’वरून वाद

## शिंदेंच्या घोषणेमुळे संतापाची लाट




**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात ‘जय गुजरात’ अशी घोषणा दिल्याने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या वक्तव्यानंतर मराठी जनतेत तीव्र नाराजी व्यक्त होत असून, सोशल मीडियावर शिंदेंवर जोरदार टीका होत आहे. अनेकांनी हा प्रकार ‘मराठी अस्मितेचा अपमान’ मानत, थेट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांची आठवण करून दिली आहे. कार्यक्रमात ‘जय गुजरात’ चा नारा कोंढवा येथील जयराज स्पोर्ट्स आणि कन्व्हेन्शन सेंटरच्या उद्धाटन कार्यक्रमात, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत भाषण करताना एकनाथ शिंदे यांनी सुरुवातीस नेहमीप्रमाणे ‘‘जय हिंद, जय महाराष्ट्र’’ असा नारा दिला. मात्र त्यानंतर काही क्षण थांबून त्यांनी ‘‘जय गुजरात’’ अशी घोषणा केली. या अनपेक्षित घोषणेमुळे उपस्थित श्रोत्यांमध्ये आश्चर्य आणि संभ्रम निर्माण झाला. सोशल मीडियावर संतापाचा उद्रेक या वक्तव्यानंतर सोशल मीडियावर याचे व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. विशेषतः एकनाथ शिंदे ‘जय गुजरात’ म्हणताना दिसत असलेला व्हिडिओ आणि त्याला जोडून बाळासाहेब ठाकरे यांची एक जुनी क्लिप व्हायरल होत आहे, ज्यात ते म्हणतात, ‘‘चाटायची सुद्धा एक मर्यादा असते’’. हे दोन व्हिडिओ एकत्र करून मीम्सच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहेत. मराठी अस्मिता आणि राजकीय आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) नेते संजय राऊत यांनी यावर तीव्र प्रतिक्रिया देत म्हटले की, ‘‘ही शिंदेसेनेची खरी ओळख आहे. मराठी जनतेचा अपमान करणाऱ्यांचे महाराष्ट्रात काहीच स्थान नाही. हा राजद्रोह आहे.’’ दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याचे समर्थन करत सांगितले की, ‘‘गुजरात आपल्या शेजारील राज्य असून, आपण त्यांच्या यशाचा सन्मान करतो. शरद पवारांनी सुद्धा पूर्वी गुजरातचे कौतुक केले होते.’’ जनतेत नाराजी, नेतृत्त्वावर प्रश्नचिन्ह मराठी जनतेच्या मनात मात्र या घोषणेमुळे अस्वस्थता निर्माण झाली आहे. ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम अशा अनेक प्लॅटफॉर्मवर लोकांनी ‘जयमहाराष्ट्र’, ‘बाळासाहेबआणिशिंदे’, आणि ‘शिंदेचागुजरातप्रेम’ असे ट्रेंड सुरू केले आहेत. एक वापरकर्ते लिहितात, ‘‘बाळासाहेबांचे नाव घेणारे शिंदे आता गुजरातचा जयजयकार करतात, ही शोकांतिका आहे!’’ तर दुसऱ्याने मीम शेअर करत लिहिले, ‘‘जय महाराष्ट्र बोलताना शरमेने मान खाली घालावी लागते का?’’ एकनाथ शिंदे यांच्या एका घोषणेमुळे राज्यात राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. मराठी अस्मिता, राज्याभिमान आणि बाळासाहेब ठाकरे यांची विचारधारा पुन्हा चर्चेत आली आहे. एक नारा त्यातून निर्माण झालेली जनभावनांची लाट ही केवळ राजकीय नाट्य नसून, ही मराठी मनाची प्रतिक्रिया आहे, जी भाजपा नेतृत्वाला गांभीर्याने घ्यावी लागेल.नाहीतर निवडणुकीत याचा फटका बसल्याशिवाय राहणार नाही.



# डॉ. सावंत यांच्या नेतृत्वात जीएसटी उत्पन्न विश्लेषणासाठी पहिली मंत्रिगट बैठक

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिगटाची वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) उत्पन्नाच्या विश्लेषणासाठी पहिली बैठक महाराष्ट्र सदन, नवी दिल्लीत पार पडली.

या महत्त्वपूर्ण बैठकीला महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, छत्तीसगड व पंजाबचे अर्थमंत्री तसेच नऊ राज्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित होते. माध्यमांशी संवाद साधताना मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, ही जीएसटी, आयजीएसटी आणि एसजीएसटी उत्पन्नासंबंधी पहिलीच बैठक आहे.

यापूर्वी मंत्र्यांच्या गटाच्या विविध मुद्द्यांवर अनेक बैठकांचा अनुभव आहे, मात्र जीएसटी उत्पन्नावर केंद्रित बैठक यापूर्वी कधीच झाली नव्हती. त्यांनी सांगितले की, या बैठकीत तांत्रिक चर्चा मर्यादित राहिली. पुढील बैठकीत सर्व राज्यांकडून सखोल सूचना आणि चर्चा अपेक्षित आहेत. तसेच, नोव्हेंबर किंवा डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत महाराष्ट्र आपले सादरीकरण करणार असल्याने आजच्या बैठकीत महाराष्ट्राकडून कोणतेही सादरीकरण करण्यात आले नाही. ही बैठक जीएसटी उत्पन्नाच्या वाढीचा मागोवा घेण्यासाठी तसेच केंद्र व राज्य सरकारांमधील समन्वय वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

# सुरेश खोपडे यांना ‘जीवनजीत गौरव पुरस्कार’

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील मोरगाव येथील सामाजिक कार्यकर्ते आणि माजी वरिष्ठ पोलीस अधिकारी सुरेश खोपडे यांना त्यांच्या सामाजिक योगदानाच्या गौरवार्थ ‘जीवनजीत गौरव पुरस्कार’ जाहीर करण्यात आला आहे. नृत्यकला संगम २०२५, भव्य कर्तृत्ववान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आणि अंजलीक फेस ऑफ पुणे २०२५ या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा सन्मान देण्यात येणार आहे. सामाजिक परिवर्तन, संवेदनशीलता आणि दूरदृष्टी यासाठी खोपडे यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. त्यांच्या कार्याने समाजात सकारात्मक बदल घडवला असून अनेकांना प्रेरणा मिळाली आहे. या विशेष पुरस्कारासाठी सुरेश खोपडे यांची निवड करण्यात आली असून,



ते या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणूनही उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमास अधिक प्रतिष्ठा लाभणार असल्याची आयोजकांची भावना आहे. हा भव्य सोहळा शनिवारी ता. ५ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता अण्णाभाऊ साठे सभागृह, पुणे सातारा रोड, बिबवेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे आयोजक आशुतोष अभिजीत संकाये पाटील यांनी मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# गरज नसलेल्या शक्तीपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचा हुंकार




**पंढरपूर । प्रतिनिधी**

राज्यातील गरज नसलेल्या आणि शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत करणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात काल ता.४ पंढरपूर येथे १२ जिल्ह्यांतील हजारो शेतकरी एकवटले. शेतकऱ्यांचे हक्क, त्यांच्या जमिनीचे संरक्षण आणि वाढत्या कर्जबाजारीपणावर तोडगा काढावा यासाठी त्यांनी विठ्ठलाच्या चरणी साकडे घातले. महायुती सरकारला शेतकऱ्यांचे हाल समजून घ्यावे आणि त्यांना न्याय द्यावा, यासाठी विठुमाऊलीकडे प्रार्थना करण्यात आली. हे आंदोलन केवळ धार्मिक स्वरूपाचे नसून शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी उचललेलं ठोस पाऊल आहे, असे मत ज्येष्ठ नेते सतेज पाटील यांनी व्यक्त केले. सतेज पाटील म्हणाले, ‘‘हा महामार्ग अनावश्यक असून, त्यामुळे हजारो शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या मालकीच्या जमिनी जाण्याचा धोका आहे. सरकारने या महामार्गाचा प्रस्ताव तातडीने रद्द करावा आणि शेतकऱ्यांच्या डोक्यावरचं कर्जाचं ओझं कमी करण्यासाठी ठोस पावले उचलावी.‘‘ यावेळी शेतकरी संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात सामूहिक प्रार्थना करून आंदोलन शांततेत पार पडले.

# स्वयंविकासालाच प्राधान्य

## जिजामातानगर काळाचौकीतील रहिवाशांचा निर्धार

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

जिजामातानगर काळाचौकी येथील झोपडपट्टीतून विविध सोसायट्यांचे प्रतिनिधी एकत्र येत परळ येथील दळवी बिल्डिंगमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत मुंबई शहरातील बिल्डरधार्जिण्या विकासाच्या विरोधात आवाज उठवत स्वयंविकासालाच प्राधान्य देण्याचा निर्धार करण्यात आला. या बैठकीत आर्किटेक्ट चंद्रशेखर प्रभु यांनी स्वयंविकासाची सविस्तर योजना उपस्थितांना समजावून सांगितली. स्वयंविकासाच्या कायदेशीर बाबी, त्याचे फायदे आणि अंमलबजावणीसंबंधी माहिती देताना त्यांनी अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. कॉम्रेड प्रकाश रेड्डी यांनी या वेळी बोलताना रहिवाशांना भक्कम एकजूट करण्याचे आवाहन केले. मुंबईतील कामगार भागातील नागरिकांनी आपल्या जागेवरच कायमस्वरूपी घर मिळवण्यासाठी संघर्ष करण्याचे आणि एकसंघ राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

# मुख्यमंत्री डॉ.सावंत यांच्यासह डॉ.तवडकर यांनी घेतली केंद्रीय वनमंत्र्यांची भेट

**पणजी । प्रतिनिधी**

गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि सभापती डॉ. रमेश तवडकर यांनी दिल्लीत केंद्रीय वन तथा पर्यावरण मंत्री भुपेंद्र यादव यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील लोकांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या वन, पर्यावरणाशी संबंधित विविध विषयांवर चर्चा केली. यावर केंद्रीय मंत्र्यांनी



सकारात्मक प्रतिसाद दिला. दरम्यान, सभापती तवडकर यांच्या दिल्ली भेटीने त्यांचा राज्य मंत्रिमंडळात लवकरच समावेश होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# होली नेम हायस्कूलमध्ये सरन्यायाधीश गवई यांचा सन्मान

## विद्यार्थ्यांना दिले यशाचे धडे

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

कुलाबा येथील होली नेम हायस्कूलमध्ये आयोजित विशेष कार्यक्रमात भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी विद्यार्थ्यांसोबत मनमोकळा संवाद साधत प्रेरणादायी विचार मांडले. या कार्यक्रमात सरन्यायाधीश गवई यांचा शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले की, ‘‘व्यक्तीच्या जडणघडणीत चांगले संस्कार आणि सकस मूल्यांची जोपासना अत्यंत महत्त्वाची असते. कोणत्याही यशाचा मार्ग हा खडतरच असतो, मात्र प्रामाणिक मेहनत, चिकाटी आणि जिंकण्याची इच्छाशक्ती या गोष्टींच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते.’’ गवई यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींनाही उजाळा दिला. ‘‘या हायस्कूलमधील विद्यार्थी म्हणून मी घालवलेला काळ खूप खास होता. आज त्याच शाळेत माझा सत्कार होत असल्याचा हा क्षण अत्यंत आनंदाचा आणि अभिमानास्पद आहे. माझ्या आईवडिलांसोबतच या शाळेने मला धर्मनिरपेक्षता, एकात्मता आणि बंधुभावाचे संस्कार दिले. विविध



समूहांतील मित्रांसोबत एकत्र शालेय जीवन जगताना भारतीय संविधानातील समतेचे मूल्य अनुभवायला मिळाले,’’ असे ते म्हणाले. या विशेष कार्यक्रमास आर्च बिशप जॉन रॉडरिक्स, बिशप डॉमनिक्स फर्नांडिस, व्यवस्थापक फादर कॉनस्टॉन्सीयो नोरोना, प्रिन्सिपॉल सिस्टर लॉरेन्सीया परेरा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीश गवई यांना विविध प्रश्न विचारून प्रेरणा घेतली. त्यांच्या साध्या आणि प्रांजळ उत्तरांनी उपस्थितांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास संचारला.

# प्रश्न उपस्थित करणे नव्हे, तर तोडगा काढणे हेच खरे नेतृत्व- घुले

## सारसनगर भागातील गढूळ व ड्रेनेजच्या पाण्याच्या समस्येवर कायमचा तोडगा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येथील सारसनगर भागातील कानडे मळा परिसरातील मुख्य जलवाहिनी गळतीमुळे गेल्या अनेक दिवसांपासून गढूळ व अस्वच्छ पाण्याचा पुरवठा होत होता. त्यामुळे आशीर्वाद कॉलनी, गाडळकर मळा, कानडे मळा, मंगल कार्यालय रोड, अरिहंत कॉलनी, विद्यासागर कॉलनी, तांत्रिक भवन, मोहटा देवी कॉलनी या भागातील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. ही गंभीर समस्या लक्षात घेत माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी स्वतः तातडीने पाहणी केली असता, ओढ्याच्या खाली गेलेली मुख्य जलवाहिनी गळतीमुळे खराब झाल्याचे स्पष्ट झाले. त्यांनी तात्काळ महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधून अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. विभागाने त्वरेने प्रतिसाद देत काम हाती घेतले आणि जलवाहिनीची गळती दुरुस्त केली. त्यामुळे परिसरात पुन्हा स्वच्छ पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे.

यावेळी पिनू कानडे, नंदूभाऊ कानडे, रासकर मामा, पाणीपुरवठा विभागाचे इंजिनिअर राहुल गीते, प्रमोद पाचारणे, फिटर वालमन राहुल वाघमारे, सोनू सुपेकर, गणेश उदारे, राजेश उदावंत आदी उपस्थित होते. माजी नगरसेवक घुले म्हणाले की, ही समस्या केवळ पाण्यापुरती नव्हती, तर आरोग्याच्या दृष्टीनेही ती अत्यंत गंभीर होती. नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये म्हणून मी स्वतः घटनास्थळी जाऊन पाहणी केली आणि तातडीने काम सुरू केले. नागरिकांना स्वच्छ पाणी मिळावे हीच माझी प्राथमिकता असून लोकांच्या विश्वासास पात्र राहणं हेच माझं कर्तव्य आहे. या भागातील नागरिकांनी दाखवलेला संयम आणि सहकार्य खरोखरच लक्षणीय आहे. अशा समस्या पुन्हा उद्भवू नयेत म्हणून मी व माझे कार्यकर्ते सातत्याने सजग राहू. स्थानिक नागरिक नंदूभाऊ कानडे म्हणाले की, गढूळ पाण्यामुळे नागरिक वैतागले होते. अनेक वेळा तक्रारी करूनही समाधानकारक उत्तर मिळत नव्हते. मात्र, माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिलं, तत्काळ कृती केली आणि सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करून हा प्रश्न मार्गी लावला. ही केवळ जलवाहिनीची दुरुस्ती नाही, तर नागरिकांच्या विश्वासाची जपणूक आहे. गेल्या १५ ते २० दिवसांपासून गढूळ पाण्याच्या पुरवठ्यामुळे परिसरात अस्वस्थता पसरली होती. या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक घुले यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधून संबंधित भागातील नागरिकांसाठी तात्काळ टँकरद्वारे स्वच्छ पाण्याचा पर्यायी पुरवठा सुरू केला. स्वयंसेवकांच्या मदतीने नियोजनबद्धरीत्या टँकर विविध भागांत पोहोचवण्यात आले. त्यांच्या या तत्परतेमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.





## दिंडीत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धन

### आत्मनिर्धार फाउंडेशनचा पुढाकार; १५० झाडांचे वितरण

**नगर तालुका । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यातून दिंडी-पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ होत असताना, त्याच माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा स्तुत्य उपक्रम आत्मनिर्धार फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात आला आहे. या उपक्रमाअंतर्गत इसळक-निंबळक येथील योगीराज श्री हरिहर महाराज दिंडी, श्री दत्त मंदिर दिंडी आणि वाहिरा (ता. आष्टी) येथील संत शेख महंमद महाराज दिंडी यांना १५० झाडांचे मोफत वितरण करण्यात आले.

यामध्ये चिंच, आवळा, जांभूळ, आंबा, पेरू, कडुलिंब, करंज आदी उपयुक्त व स्थानिक रोपांचा समावेश होता. यावेळी आत्मनिर्धार फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी, पर्यावरण संवर्धन समितीचे संदीप गेरंगे, संभाजी सोनवणे, हभप केरू महाराज कोतकर, घनश्याम म्हस्के यांच्यासह भजनी मंडळे, वारकरी व महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिंडी मार्गावर ज्या अन्नदाता व भाविकांचे दर्शन लाभेल, त्यांचा रोप भेट देऊन सत्कार केला जाणार असून, ती रोपे संबंधितांच्या आवारात लावण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला. श्री दत्त मंदिर दिंडी सोहळ्याचे समन्वयक हभप संदीप महाराज कळसे म्हणाले, ‘‘यावर्षी वेळेअभावी जास्त योगदान देता आले नसले, तरी पुढील वर्षी हा उपक्रम अधिक व्यापक व उंचीवर नेण्याचा निर्धार केला आहे.’’

**पर्यावरण रक्षणाचा स्तुत्य उपक्रम**

**योगीराज श्री हरिहर महाराज दिंडी सोहळ्याचे संयोजक हभप डॉ. जालिंदर महाराज निकम यांनी यावेळी सांगितले की, ‘‘पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जास्तीत जास्त वृक्ष लागवड करणे आज काळाची गरज आहे. दिंडी सोहळ्यांमध्ये सहभागी होत असताना प्रबोधनासह कृतीचीही गरज आहे, आणि त्या दृष्टीने आत्मनिर्धार फाउंडेशनने घेतलेला पुढाकार निश्चितच प्रेरणादायी आहे.’’**

**पर्यावरण संवर्धन हे राष्ट्रीय कर्तव्य**

**संत शेख महंमद महाराज पालखी सोहळ्याचे हभप मेटे महाराज यांनी सांगितले की, ‘‘निसर्गाच्या झालेल्या मोठ्या प्रमाणातील हानीमुळे आज पर्यावरण संवर्धन ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आणि राष्ट्रीय कर्तव्य आहे. यासाठी एकत्रितपणे कृती हाच पर्याय आहे. आत्मनिर्धार फाउंडेशनच्या सहकार्याने सुरू झालेला वृक्षारोपण उपक्रम संत परंपरेतून सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा आहे.’’**

## ऑनलाईन फसवणुक झाल्यास बँकच जबाबदार

### ॲड. मुंदडा यांची माहिती

**अहमदनगर । प्रतिनिधी**



येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दिलेल्या एका ऐतिहासिक निर्णयात ऑनलाईन फसवणुकीमुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई बँक ऑफ इंडियाने तक्रारदाराला देण्याचे आदेश दिले आहेत. प्रकाश संचालाल जैन या बांधकाम व्यवसायिकांच्या खात्यातून त्यांची परवानगी न घेता व ओटीपी न मिळवता वजावट झालेली रक्कम ७४,९३८/- रुपये बँकेने व्याजासह परत करावे, असे आदेश आयोगाने दिले आहेत. तक्रारदार जैन यांच्या खात्यातून १५ व १६ ऑक्टोबर २०२२ रोजी एकूण सात वेळा परस्पर १,५६,०४७/- रुपये वजावट झाली होती. यावर जैन यांनी बँकेत, सायबर पोलीस ठाण्यात आणि बँकिंग लोकपालाकडे तक्रार दाखल केली होती. बँकेने केवळ ७२,५०७/- रुपये परत केले; मात्र उर्वरित रक्कम न मिळाल्याने ॲड. सुनिल बी. मुंदडा यांच्या माध्यमातून ग्राहक आयोगात तक्रार दाखल करण्यात आली. बँकेने बचाव करताना खात्यावर विमा असल्याचे आणि उर्वरित रक्कम विमा कंपनीने नाकारल्याचे सांगितले. मात्र आयोगाने तक्रारदाराचा युक्तिवाद मान्य करत बँकेची ग्राहकांसमोर असलेली जबाबदारी अधोरेखित केली. बँकेने सुरक्षित ऑनलाईन प्रणाली अवलंबण्याचे निर्देश देत, रक्कम परत करण्याचा व मानसिक त्रासासाठी १०,०००/- रुपये आणि तक्रार खर्चासाठी ७,०००/- रुपये देण्याचा आदेश दिला. आदेशानुसार ही संपूर्ण रक्कम आदेशाची प्रत मिळाल्यानंतर ३० दिवसांच्या आत व्याजासह देणे बंधनकारक आहे. सर्वसामान्य बँक ग्राहकांना हा निर्णय दिलासा देणारा असून बँकांनी अशा प्रकारच्या फसवणुकीपासून ग्राहकांचे रक्षण करणे ही त्यांच्या सेवा जबाबदारीचा भाग असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. तक्रारदार प्रकाश जैन यांच्यावतीने ॲड. सुनिल बी. मुंदडा ९८२२२८६७१२ यांनी कामकाज पाहिले.

**प्रकाश जैन यांना व्याजसह मिळणार संपुर्ण रक्कम; ऑनलाईन फसवणुकीची रक्कम बँक ऑफ इंडियाने परत करण्याचे ग्राहक मंचाचे आदेश**

## शालेय विद्यार्थ्यांवर आध्यात्मिक संस्कारांची गरज- गोविंद मालपाणी

### श्री नाथ विद्यामंदिरची बालदिंडी



**अहमदनगर । विजय मते**

‘‘भारतीय हिंदू संस्कृतीतील सण-उत्सव हे केवळ आनंदाचे क्षण नसून, ते संस्कारांचे माध्यम आहेत. गणेशोत्सव, नवरात्र, गुढीपाडवा, आषाढी वारी यांसारख्या सणांतून परंपरा टिकवली जाते. आजच्या यांत्रिक युगात विद्यार्थ्यांवर आध्यात्मिक संस्कार होणे ही काळाची गरज आहे. मूल्य, श्रद्धा, संयम आणि सेवा यांचे बीज बालवयातच पेरले गेले पाहिजे,’’ असे प्रतिपादन उद्योजक गोविंद मालपाणी यांनी केले.

वसंत टेकडी येथील श्री.नाथ विद्या मंदिरात आषाढी वारीनिमित्त बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालखीचे पूजन गोविंद मालपाणी व सौ. अश्विनी मालपाणी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमासाठी संस्थेचे सहसचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, मुख्याध्यापिका अनिता सिद्धम, प्राचार्या विजया नवले, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोविंद मालपाणी पुढे म्हणाले, ‘‘विद्यार्थ्यांच्या मनात भक्तीभाव रुजवणे आणि सामाजिक एकोपा निर्माण करणे ही शिक्षणसंस्थांची जबाबदारी आहे. अध्यात्म आणि संस्कृती यांचा संगम झाला तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. श्री.नाथ विद्या मंदिर ही परंपरा जोपासणारी शाळा असून तिचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.’’ प्राथमिक विभागातील बालचिमुकल्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, सावता माळी आदी संतांच्या वेषभूषेत दिंडीत सहभाग घेतला. ‘‘विठू नामाचा गजर’’ करीत शिवनगर परिसरातील मंदिरापर्यंत ही पालखी मिरवणूक पोहोचली. मंदिरात भाविकांच्या उपस्थितीत रिंगण सोहळा व प्रदक्षिणा पार पडली. यानंतर सिद्धेश्वर मंदिर परिसरात भजनी मंडळाच्या वतीने बाल वारकऱ्यांना फराळाचा प्रसाद देण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, बबन नागरे, अनिल काळे, महेंद्र पांडे, भजनी मंडळातील महिला सदस्य तसेच अनेक भाविक व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी मुख्याध्यापिका अनिता सिद्धम यांनी बोलताना सर्व पालक, वारकरी, भजनी मंडळ व शिक्षकांचे मन:पूर्वक आभार मानले.

## शहीद अब्दुल हमीद जयंतीनिमित्त मखदुम सोसायटीतर्फे शालेय साहित्य वाटप



**अहमदनगर । आबीद खान**

‘‘शहीद अब्दुल हमीद यांचं बलिदान आपल्याला कर्तव्यनिष्ठा व देशासाठी सकारात्मक योगदान देण्याची प्रेरणा देतं,’’ अशा भावना हाजी आलम खान यांनी व्यक्त केल्या. मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी आणि रहमत सुलतान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद अब्दुल हमीद यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद शाळा, फकीरवाडा येथे विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. ही वह्यावाटप उपक्रम मरहुम हज्जन शमीम सैफअली यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या कुटुंबीयांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शफी हज उमरा टुर्सचे संस्थापक हाजी आलम खान, मुस्कान वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद, अलनुर आय केअर सेंटरचे तनवीर चष्मावाला, मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, तसेच शेख दिलशाद मुसा, पठाण सुमय्या मोहसीन, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी बुशरा बाजी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना हाजी आलम खान म्हणाले, ‘‘शहीद अब्दुल हमीद यांचं जीवन हे देशप्रेम, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेचं प्रतीक आहे. आपण शस्त्र न घेताही शिक्षण, सत्य आणि कर्तव्यातून देशसेवा करू शकतो. वह्यावाटप केवळ साहित्य वाटप नसून, पुढच्या पिढीला शिकण्याची, घडण्याची प्रेरणा देणारा सामाजिक संदेश आहे. शिक्षण हीच खरी शक्ती आहे!’’ शहीद अब्दुल हमीद यांना त्यांच्या अतुलनीय शौर्याबद्दल भारताचा सर्वोच्च लष्करी सन्मान परमवीर चक्र मरणोत्तर बहाल करण्यात आला होता.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# भारताला शह देण्यासाठी चीन- पाकिस्तानची नवी खेळी



साऊथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल कॉपरेशन अर्थात सार्क ही दक्षिण आशियाई देशांची शिखर संघटना १९८५ साली स्थापन झाली. दक्षिण आशियाई देशात सहकार्य विकसित करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दक्षिण आशियाई देशांचा दबावगट निर्माण करण्यासाठी या संघटनेची स्थापना झाली. ही संघटना स्थापन करण्यात भारताचे मोलाचे योगदान होते किंबहुना भारताच्या पुढाकारानेच ही संघटना स्थापन झाली म्हणूनच सुरुवातीपासूनच या संघटनेवर भारताचे वर्चस्व होते. २०१५ सालापर्यंत या संघटनेची दरवर्षी सहयोगी सदस्य असलेल्या देशात शिखर परिषद आयोजित केली जायची. २०१६ साली या संघटनेची पाकिस्तान येथे शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती मात्र शिखर परिषद होण्याआधीच पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी जम्मू काश्मिरच्या उरी येथील लष्करी तळावर भ्याड हल्ला केला त्यामुळे दोन्ही देशातील संबंध बिघडले त्या पार्श्वभूमीवर भारताने या शिखर परिषदेसाठी पाकिस्तानात जाण्यास नकार दिला. भारताने नकार दिल्याने अन्य देशांनीही पाकिस्तानात जाण्यास नकार दिला त्यामुळे त्यावर्षी शिखर परिषद रद्द करण्यात आली. त्यानंतरही दोन्ही देशांतील संबंध तणावपूर्णच राहिले. या दरम्यान सार्क संघटनेतील बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ या देशातही मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. तेथील सरकार उलथून टाकण्यात आले. नवीन सरकारे अस्तित्वात आली त्यामुळे सार्क परिषदेची बैठक होऊ शकली नाही. आता तर सार्क संघटना मरणासन्न अवस्थेत आहे. ही संघटना असून नसल्यागत आहे त्यामुळे दक्षिण आशियाई देशांवर भारताचे जे वर्चस्व होते ते देखील कमी झाले. दक्षिण आशियामधील भारताचा प्रभाव कमी झाला याचाच फायदा चीन आणि पाकिस्तान यांनी घेण्याचे ठरवले. काही दिवसांपूर्वी चीनमधील कुणमिंग या शहरात चीन, बांगलादेश आणि पाकिस्तान या तीन देशांची त्रिपक्षीय चर्चा पार पडली. या चर्चेचा मुख्य अजेंडा होता सार्कला पर्याय देणारी नवीन संघटना उभारणे. या त्रिपक्षीय बैठकीबाबतची बातमी पाकिस्तानी आणि बांगलादेशी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली आहे. दक्षिण आशियात असलेला भारताचा प्रभाव कमी करणे. ही संघटना उभारून भारताला शह देणे हाच उद्देश ही नवी संघटना उभारण्यामागे या दोन्ही देशांचा आहे. चीन, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, मालदीव आणि अफगाणिस्तान या देशांचा या नव्या संघटनेत समावेश करण्याच्या हालचाली सुरू आहे. भारताला फक्त निमंत्रित सदस्य म्हणून या संघटनेत ठेवले जाणार आहे असेही या बातमीत म्हटले आहे अर्थात चीन पाकिस्तानने उभारलेल्या या संघटनेत भारत निमंत्रित सदस्य म्हणून सहभागी होण्याची सुतराम शक्यता नाही. दक्षिण आशिया मध्ये असणारा भारताचा प्रभाव कमी करण्यासाठीच चीन आणि पाकिस्तानचा हा सर्व खटाटोप चालू आहे. त्यांना बांगलादेशचीही साथ मिळत आहे. गेल्या काही दिवसात बांगलादेश आणि भारताचे संबंध देखील बिघडले आहेत त्याचाच फायदा घेत या दोन्ही देशांनी बांगलादेशला आपल्या बाजूने वळवले आहे. केवळ बांगलादेशच नाही तर श्रीलंका, मालदीव आणि अफगाणिस्तान यांनाही आपल्या बाजूने करून घेण्यासाठी त्यांना या संघटनेत घेतले जाणार आहे. मागील वर्षी मालदीव आणि भारताच्या संबंधात ही तणाव निर्माण झाला होता. श्रीलंकेचे विद्यमान राष्ट्रप्रमुख हे चीन धार्जिणेच आहेत. अफगाणिस्तानशी जरी भारताचे संबंध सौहार्दपूर्ण असले तरी तेथील तालिबानी सरकारला भारताने अजूनही अधिकृत मान्यता दिलेली नाही या पार्श्वभूमीवर या देशांना आपल्या बाजूने वळवून त्यांची एक शिखर संघटना स्थापन करण्याचा निर्णय या दोन्ही देशांनी घेतलेला दिसतोय.

अर्थात भारत चीन आणि पाकिस्तानचा हा डाव ओळखून आहे. या तीन देशात झालेल्या चर्चेची भारताने गांभीर्याने नोंद घेतली असून भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताच्या शेजारी असणाऱ्या देशांना सूचक इशारा देताना म्हटले आहे की शेजारी देशांना भारताशी सहकार्य करण्याचे लाभ मिळतात आणि हे सहकार्य नाकारण्याची किंमतही चुकती करावी लागते. एस जयशंकर यांचा हा इशारा या नव्या संघटनेत सामील होणाऱ्या देशांनाच होता. भारताने या संघटनेत सामील होणाऱ्या देशांना केवळ इशारा देऊन उपयोग नाही तर त्यांना त्यांची जागाही दाखवून द्यायला हवी. भारताच्या शेजारी असलेले हे देश त्यांना गरज असताना भारताला मदतीची याचना करतात. भारताशी मैत्रीचे नाटक करतात मात्र जेव्हा त्यांची गरज संपते तेव्हा भारताला विसरून चीनच्या कच्छपी लागतात. गरज सरो वैद्य मरो अशीच भारताच्या शेजारी देशांची भूमिका असते.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# 'दाम करी काम' पंचायत समितीची अवस्था

## सामाजिक कार्यकर्त्याचा गंभीर आरोप

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकाऱ्यांचे आदेश ठेकेदारी व अकरा महिन्यांच्या करारावर असलेल्या कर्मचाऱ्यांकडून पाळले जात नसल्याची तक्रार समोर आली आहे.

रोजगार हमी योजना, घरकुल, समाजकल्याण तसेच उमेद अभियान या विभागांत अपारदर्शक व अनागोंदी कारभार सुरू असून, सामान्य नागरिकांचे काम पैसे दिल्याशिवाय होत नसल्याचा आरोप माणिकदौंडी येथील सामाजिक कार्यकर्ते सुनील पाखरे यांनी केला आहे. त्यांनी सांगितले की, पंचायत समितीमध्ये "दाम करी काम" अशी स्थिती निर्माण झाली असून, ज्या लाभार्थ्यांकडे आवश्यक ठराव आहेत, त्यांना योजनांचा लाभ मिळत नाही, तर एजंटमार्फत आलेले प्रस्ताव तात्काळ मंजूर होतात. पाखरे यांनी यासंदर्भात पंचायत समितीच्या कारभारात सुधारणा न झाल्यास छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या खंडपीठात याचिका दाखल केली जाईल, असा इशारा दिला आहे. त्यांच्या मते, पंचायत समिती कार्यालयाचा दैनंदिन कारभार संशयास्पद पद्धतीने सुरू असून, यावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांकडे विनंती केली आहे. पंचायतराज व्यवस्थेनुसार ग्रामपंचायतीवर पंचायत समितीचे, तर पंचायत समितीवर जिल्हा परिषदेचे नियंत्रण असते. ग्रामविकासाच्या धोरणानुसार तालुक्यातील संपूर्ण गावांमध्ये शासनाच्या विविध योजना जसे की रोजगार हमी योजना, घरकुल योजना, समाजकल्याण विभाग, आरोग्य विभाग व उमेद अभियानाच्या योजना राबविल्या जातात.



या योजनांच्या अंमलबजावणीसाठी सहाय्यक यंत्रणा तयार करण्यात आलेली आहे, जी विभागीय प्रमुखांद्वारे कार्यरत असते. परंतु, पाखरे यांच्या मते अनेक गावांचे सरपंच असाक्षर असून त्यांच्यासोबत सरपंच पती अथवा ठराविक ग्रामसेवक काम करत असल्याने, विविध योजनांचे ठराव अपारदर्शक पद्धतीने व नियमनाबाहेर तयार केले जात आहेत. पंचायत समितीतील काही विभागांत तर थेट अपारदर्शकता आणि अर्थपूर्ण तडजोडी करून योजनांचे लाभ हडप केल्याचे प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. विशेष ग्रामसभेचे ठराव व परिपूर्ण प्रस्ताव सादर करून देखील अनेक पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत.

पंचायत समितीच्या टपाल विभागातून सादर केलेले प्रस्ताव सुद्धा दुर्लक्षित होत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे सहाय्यक यंत्रणेबरोबरच संपूर्ण कार्यपद्धतीवर जनतेत प्रचंड रोष व असंतोष निर्माण झाला आहे. सुनील पाखरे यांनी स्पष्ट केले की, पंचायत समितीचा कारभार लोकाभिमुख, गतिमान आणि पारदर्शक न केल्यास, वंचित लाभार्थ्यांच्या वतीने पंचायत समितीला घेराव घालण्यात येईल आणि न्यायालयीन मार्ग स्वीकारला जाईल.

# बेकायदेशिर जमिनीच्या ताबेमारीवर कारवाईची मागणी

## भारतीय जनसंसदेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय जनसंसदेच्या वतीने जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना एका निवेदनाद्वारे जमिनीच्या ताबेमारी प्रकरणांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षक यांनाही सुपूर्द केली आहे. भारतीय जनसंसदेचे जिल्हाध्यक्ष सुधीर राजाराम भद्रे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले की, कोणत्याही व्यक्तीला कायदेशीर मार्गाने जमिनीचा ताबा घेण्याचा हक्क आहे. मात्र, सध्या नगर शहर आणि तालुक्यातील काही गावांमध्ये जमिनीच्या वाढत्या किंमतीमुळे काही व्यक्ती वादग्रस्त जमिनी खरेदी करत आहेत व त्यावर बेकायदेशीररीत्या ताबा मिळवत आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. विशेषतः न्यायालयात प्रलंबित



असलेल्या जमिनीच्या प्रकरणांमध्ये सुद्धा अशा प्रकारचे ताबेमारीचे प्रकार घडत असून, पोलिस विभागाने याची गंभीर दखल घेऊन योग्य कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. चिचोंडी पाटील गावात दीड वर्षांपूर्वी अशाच प्रकारे ताबेमारी करणाऱ्या टोळीचा म्होरक्या सध्या नाशिक कारागृहात मोक्का अंतर्गत शिक्षा भोगत आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नगर शहर व तालुक्यात सातारा, सांगली, पुणे, संभाजीनगर येथून काही लोक येऊन वादग्रस्त जमिनी खरेदी करत असल्याचे निदर्शनास आले असून, या संदर्भातील व्यक्तींची सखोल पार्श्वभूमी तपासली जावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, चिचोंडी पाटील येथील अक्षय संजय कोळी यांनी या मागणीस विरोध करत आपले स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, जनसंसदेने आपल्या मागणीच्या पाठपुराव्यासाठी दै. लोकमत, सायंदैनिक आकर्षण आणि दै. रयत समाचारमधील बातम्यांचे कात्रण जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून




दोषींवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी विनंती राज्याध्यक्ष अशोक सब्बन, जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे, कैलास पठारे, रईस शेख, पोपटराव साठे, रामशेठ धोत्रे, वीरबहादुर प्रजापती यांनी केली आहे.

# विकासकामांची मुख्य अधिकाऱ्यांकडून पाहणी

## मातोश्रींच्या स्मरणार्थ वटवृक्षाची लागवड



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

अहमदनगर जिल्ह्यातील आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या वाघोली येथे ता. ३ जुलै २०२५ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, तसेच शेवगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी सदिच्छा भेट देऊन गावातील विविध विकास कामांची पाहणी केली. ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत कार्यालयात मान्यवरांचे उत्स्फूर्त स्वागत करून त्यांचा यथोचित सत्कार केला. पाहणीदरम्यान मान्यवरांनी शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, स्मशानभूमी, जलसंधारण प्रकल्प, वृक्षारोपण यांसह इतर महत्त्वाच्या कामांचे निरीक्षण करून समाधान व्यक्त केले आणि येणाऱ्या काळातील प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे, याच कार्यक्रमात "एक पेड मा के नाम" या पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत भंडारी, गुंजाळ आणि शहा यांच्या मातोश्रींच्या स्मरणार्थ वटवृक्षाची लागवड करण्यात आली. ग्रामस्थांनी या अभिनव उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. या प्रसंगी ग्रामपंचायत वाघोलीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, सदस्य, तसेच पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाघोली ग्रामस्थांनी एकजुटीने दिलेल्या सहभागामुळे आणि गावातील प्रगतीचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी वाघोली गावाला 'आदर्श गाव' म्हणून गौरविले, अशी माहिती सूत्रांनी दिली.




# कर्जतचे सुपुत्र चंद्रकांत काळोखे यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार

**कर्जत । राहुल जाधव**

"जगे तर देशासाठी, मरे तर देशासाठी" या तत्त्वाला आत्मसात करत गेली ३५ वर्षे सामाजिक, शैक्षणिक व विविध उपक्रमांद्वारे निस्वार्थ सेवा करणारे कर्जत तालुक्याचे सुपुत्र चंद्रकांत काळोखे यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार-२०२५ प्रदान करण्यात आला. या संदर्भात माहिती देताना संत सदगुरू गोदड महाराज आयटीआयचे शासकीय सदस्य व माजी सरपंच बाळासाहेब लोंढे यांनी सांगितले की, काळोखे यांनी वंचित, उपेक्षित घटकांना त्यांच्या हक्काचं स्थान मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्य केलं आहे. नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय अधिवक्ता संमेलनात भारतीय संविधान अधिवक्त्यांच्या व्यासपीठावर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते. चंद्रकांत काळोखे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरणा देणे, शाळांची स्थापना, महिला बचतगट, व्यसनमुक्ती चळवळ, ग्रामविकास, अपंगांना मदत, बेरोजगारांसाठी रोजगार मेळावे व मार्गदर्शन शिबिरे यांसारख्या उपक्रमांतून बहुमोल कार्य केले आहे. पुरस्कार स्वीकारताना काळोखे म्हणाले, "समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवणे हाच माझा खरा धर्म आहे. हा सन्मान माझा नसून, माझ्यासोबत अखंड कार्यरत असलेल्या सर्व सहकाऱ्यांचा आहे." ते गेल्या तीन दशकांपासून 'सुंदर भारत अभियान', स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, रक्तदान शिबिरे, महिला सबलीकरण योजना, युवक करिअर मार्गदर्शन, अपघातग्रस्तांना त्वरित मदत, आपत्ती व्यवस्थापन अशा उपक्रमांमधून समाजासाठी अविरत कार्यरत आहेत. या कार्याची दखल घेत यापूर्वीही त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. मात्र 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार-२०२५' हा राष्ट्रीय स्तरावरील विशेष सन्मान त्यांच्या कार्याचा सर्वोच्च गौरव ठरला आहे.

# वाढदिवसानिमित्त रक्तदान करून जपली सामाजिक बांधिलकी

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

गावाचा सर्वांगीण विकास, शासकीय योजना जनतेपर्यंत पोहोचवणे आणि पारदर्शक व सजग प्रशासकीय कार्यपद्धती यासाठी ओळखले जाणारे, शांत, संयमी व कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी हरिष गडाख यांचा वाढदिवस हिवरगाव पावसा ग्रामस्थांनी उत्साहात साजरा केला. वाढदिवसानिमित्त नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप शिबिर, सर्व रोग निदान शिबिर, रक्तदान शिबिर यांचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य उपक्रमास हिवरगाव पावसा व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. सरपंच सुभाष गडाख यांनी सांगितले की, हरिष गडाख यांनी प्रशासकीय सेवेमध्ये रुजू होऊन जनतेच्या सेवेचे ध्येय उराशी बाळगले. ते सध्या हिवरगाव पावसा येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत असून, गावातील पायाभूत सुविधा, महिला व बालकल्याण, पोषण आहार यावर विशेष भर दिला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पारेगाव (ता. संगमनेर) येथे सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या हरिष गडाख यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर परीक्षेत यश मिळवून प्रशासकीय सेवेत प्रवेश मिळवला. त्यांचा कार्यकाळ विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसिद्ध आहे. हिवरगाव पावसा येथील सांस्कृतिक सभागृहात झालेल्या शिबिरात २०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. ११३ नागरिकांना मोफत चष्म्याचे वाटप झाले. विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी केली. काही मोतीबिंदू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते गणेश दवंगे यांनी दिली. पत्रकार नितीनचंद्र भालेराव यांनी गडाख यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. सामाजिक कार्यकर्ते केशव दवंगे यांनी हिवरगाव पावसा येथील शंभर घरकुल लाभार्थ्यांना योजना मिळवून देण्यासाठी त्यांच्या विशेष प्रयत्नांची माहिती दिली. या



वेळी सरपंच सुभाष गडाख, भाजपा माजी तालुकाध्यक्ष काशिनाथ पावसे, राजहंस दूध संघाचे संचालक डॉ. प्रमोद पावसे, देवगड देवस्थान अध्यक्ष गणपत पावसे, ज्येष्ठ संपादक यादवराव पावसे, ओजस्वी भारत फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष उत्तम जाधव, भाजपा तालुका उपाध्यक्ष गणेश दवंगे, सेवा निवृत्त पोलीस निरीक्षक नारायण पावसे, डॉ. संदीप पावसे, भीमाशंकर पावसे, किरण पावसे, केशव दवंगे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. नेत्रज्योत फाउंडेशन, डॉ. भानुदास ढेरे आयुर्वेद महाविद्यालय कऱ्हे, आधार ब्लड बँक संगमनेर यांच्या डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी शिबिरात मोलाचे योगदान दिले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य, कर्मचाऱ्यांचे तसेच ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.